सुवर्णपदक राखण्याचे नीरजचे उद्दिष्ट

जागतिक अजिंक्यपद ॲथलेटिक्स स्पर्धा आजपासून

पीटीआय, टोक्यो

देशभरातील असंख्य चाहत्यांच्या अपेक्षांचे ओझे खांद्यावर घेऊन भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्राने जागतिक अजिंक्यपद ॲथलेटिक्स स्पर्धेत सुवर्णपदक टिकविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. जागतिक स्पर्धेला आजपासून टोक्योच्या ऑलिम्पिक मैदानावर सुरुवात होत आहे.

नीरजने २०२३ मध्ये बुडापेस्ट येथे झालेल्या स्पर्धेत ८८.१७ मीटर फेक करत सुवर्णपदक जिंकले होते. पाकिस्तानचा अर्शद नदीम रौप्य, तर चेक प्रजासत्ताकचा याकूब वाल्डेज कांस्यपदकाचा मानकरी ठरला होता. त्यानंतर नीरजला ऑलिम्पिक स्पर्धेत सुवर्णपदक राखता आले नाही. पाकिस्तानच्या अर्शद नदीमने पॅरिसमध्ये सुवर्णपदक पटकावले. नीरजला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले होते.

भालाफेक प्रकाराची अंतिम फेरी अखेरच्या दिवशी म्हणजे १८ सप्टेंबरला होणार आहे. नीरज विजेतेपद टिकविण्यात यशस्वी ठरल्यास सलग दोन स्पर्धेत अशी कामगिरी करणारा नीरज तिसरा खेळाडू ठरणार आहे. यापूर्वी अशी कामगिरी सध्या नीरजचे प्रशिक्षक असलेले यान झेलेझ्नी (१९९३, १९९५) आणि ग्रेनाडाचा ॲंडरसन पीटर्स (२०१९ आणि २०२२) यांनी केली आहे.

भारताने या स्पर्धेत १९ सदस्यांचा संघ पाठवला आहे. अर्थात, पदकाच्या आशा केवळ नीरजकडून आहेत असे म्हटले तर चूक ठरणार नाही. नीरजला नदीमसह यंदाचा डायमंड लीग विजेता ज्युलियन वेबर यांचे तगडे आव्हान राहणार आहे. त्याने यंदाच्या हंगामात तीन वेळा नव्वद मीटरचे अंतर पार केले आहे. तुलनेत नीरजला केवळ एकदाच या आव्हानात्मक आकड्याला गाठता आले आहे. यंदा नीरजसह सचिन यादव, यशवीर सिंग, रोहित यादव यांचादेखील समावेश आहे. प्रथमच भारताचे चार खेळाडू एकाच प्रकारात सहभागी झाले आहेत. गेल्या स्पर्धेत भारताचे तीन स्पर्धक सहभागी होते. तेव्हा किशोर जेना आणि डी. पी. मनू अनुक्रमे पाचव्या, सहाव्या स्थानावर राहिले होते.

हा क्रीडा प्रकार वगळता अन्नू राणी (महिला भालाफेक), पारुल चौधरी (महिला ३ हजार मीटर स्टिपलचेस), मुरली श्रीशंकर (लांब उडी), गुलवीर सिंग (५ हजार मीटर), प्रवीण चित्रावेल (तिहेरी उडी) हे खेळाडू किमान अंतिम फेरी गाठतील अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे. विजयमंचावर येण्यासाठी मात्र, त्यांना आपल्यातील क्षमतेच्या पलीकडे जाऊन सर्वोत्तम प्रदर्शन करावे लागणार आहे. अन्नू राणी पाचव्यांदा जागतिक स्पर्धेत सहभागी होत असली, तरी ती पदकापासून दूर आहे. आतापर्यंत ती केवळ दोनच (२०१९ आणि २०२२) स्पर्धांत अंतिम फेरी गाठू शकली आहे. यंदाच्या हंगामात अन्नूची ६२.५९ मीटर अशी सरस कामगिरी आहे. विजयमंचावर पोहोचण्यासाठी तिला किमान ६५ मीटर आणि त्याहून अधिक फेक करावी लागणार आहे.

दुखापतीतून बरे होत मुरली शंकर अगदी अखेरच्या क्षणी जागतिक स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. स्पर्धेत पहिल्या दिवशी भारताचा प्रवास पुरुष, महिलांच्या ३५ कि.मी. चालण्याच्या शर्यतीपासून सुरू होईल. राम बाबू आणि संदीप कुमार, तर प्रियंका गोस्वामी हे भारतीय स्पर्धक आहेत. संध्याकाळच्या सत्रात पूजा १५०० मीटर शर्यतीच्या पात्रता फेरीमध्ये सहभागी होईल.

दुर्दैवी अविनाश साबळे

महाराष्ट्राचा अविनाश साबळे हा पुरुषांच्या तीन हजार मीटर स्टिपलचेससाठी पात्र ठरला होता. मात्र, डायमंड लीगमध्ये झालेल्या गंभीर दुखापतीमुळे त्याच्या गुडघ्यावर शस्त्रक्रिया करावी लागली. अविनाशवर मुंबईतच डॉ. दिनशॉ पारडीवाला यांनी यशस्वी शस्त्रक्रिया केली. मात्र, त्याला सहा महिन्यांच्या सक्तीच्या विश्रांतीचा सल्ला देण्यात आल्यामुळे अविनाशला जागतिक स्पर्धेपासून दूर राहावे लागले.

अनिमेश, तेजसचे पदार्पण

राष्ट्रीय विक्रम नोंदवणारे अनिमेश कुजूर (२०० मीटर) आणि तेजस शिरसे (१९० मीटर अडथळा) हे दोन्ही धावपटू प्रथमच जागतिक स्पर्धेत सहभागी होत आहेत. यातही २०० मीटर शर्यतीसाठी प्रथमच भारताचा स्पर्धक पात्र ठरला आहे. मात्र, जागतिक आव्हान लक्षात घेता अनिमेश, तेजस आपली धाव कशी पुढे नेतात हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

बांगलादेशसमोर श्रीलंकेचे आव्हान

अबू धाबी : हाँगकाँगविरुद्ध पहिल्या सामन्यात विजय मिळवल्यानंतर उत्साहित झालेल्या बांगलादेशसमोर आज, शनिवारी आशिया चषकाच्या 'ब' गटाच्या सामन्यात सहा जेतेपद मिळवणाऱ्या श्रीलंकेचे आव्हान असेल.

स्पर्धेत बांगलादेशची सुरुवात चांगली राहिली. कर्णधार लिटन दासच्या ५९ धावांच्या खेळीच्या जोरावर बांगलादेशने हाँगकाँग संघावर सात गडी राखून विजय मिळवला. बांगलादेशने सामन्यात विजय मिळवला असला, तरीही त्यांच्या अनेक चुका समोर आल्या. वेगवान गोलंदाज तस्कीन अहमद आणि लेग स्पिनर रिशाद हुसेन यांनी गडी बाद करूनही धावा दिल्या. श्रीलंकेविरुद्ध ही चूक संघाला महाग पडू शकते. श्रीलंकेचा संघ तिन्ही विभागांत संतुलित दिसत असल्याने बांगलादेशसमोर चांगल्या कामगिरीचे आव्हान असेल.

चरिथ असालंकाच्या नेतृत्वाखाली श्रीलंकेने भक्कम संघ तयार केला आहे. यामध्ये संघात मजबूत शीर्ष क्रम आणि अमिरातीच्या परिस्थितीनुसार फिरकी आक्रमण यांचा समावेश आहे. पथुम निसांका, कुसाल मेंडिस आणि कुसाल परेरा शीर्ष फळीला स्थिरता देतात. तर, असालंका, दासुन शनाका आणि कमिन्दु मेंडिस यांच्यामुळे श्रीलंकेच्या फलंदाजीची खोली कळते.

- **वेळ :** रात्री ८ वा.
- **थेट प्रक्षेपण :** सोनी स्पोर्ट्स टेन १, ३.

लक्ष्य, सात्त्विक-चिराग जोडी उपांत्य फेरीत

हाँगकाँग : भारताचा लक्ष्य सेन तसेच सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीने शुक्रवारी हाँगकाँग खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या (सुपर ५०० दर्जा) अनुक्रमे पुरुष एकेरी व दुहेरी गटाच्या उपांत्य फेरीत धडक मारली.

लक्ष्यने आयुष शेट्टीला एक तास सहा मिनिटे चाललेल्या सामन्यात २१-१६, १७-२१, २१-१३ असे पराभूत केले. आयुषने यापूर्वी २०२३ मध्ये जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील रौप्यपदक विजेत्या कोडाई नाराओकाला तीन गेममध्ये चाललेल्या सामन्यात नमविले होते. सामन्यातील पहिला गेम लक्ष्यने जिंकत चांगली सुरुवात केली. दुसऱ्या गेममध्ये आयुषने आपला खेळ उंचावताना लक्ष्यपुढे आव्हान उपस्थित केले. लक्ष्यच्या चुकांचा फायदा घेत त्याने गेम जिंकत लढत बरोबरीत आणली. निर्णायक गेममध्ये लक्ष्यने आयुषला पुनरागमनासाठी कोणतीच संधी न देता सामन्यात विजय नोंदवला. उपांत्य फेरीत लक्ष्यसमोर तिसऱ्या मानांकित चायनिज तैपेइच्या चोउ तिएन चेनचे आव्हान असेल.

त्यापूर्वी, भारताची आघाडीची जोडी सात्त्विक-चिरागने ६४ मिनिटे चाललेल्या सामन्यात मलेशियाच्या आरिफ जुनैदी आणि रॉय किंग याप जोडीला २१-१४, २०-२२, २१-१६ असे नमविले. सात्त्विक-चिरागने सामन्याची धिमी सुरुवात केली. मात्र, गुणांची कमाई करीत गेम १२-१२ असा बरोबरीत आणला. मग, सलग पाच गुणांची कमाई करीत पहिला गेम जिंकला. मलेशियन खेळाडूंनी दुसऱ्या गेममध्ये जोरदार पुनरागमन केले. मात्र, सात्त्विक-चिरागने खेळ उंचावत २०-२० अशी बरोबरी साधली. मलेशियाच्या खेळाडूंनी दोन गुणांची कमाई करताना गेम जिंकत लढत बरोबरीत आणली. तिसऱ्या आणि निर्णायक गेममध्ये भारतीय जोडीने चांगला खेळ केला. त्यांनी मलेशियन जोडीला एकही आघाडी घेऊ दिली नाही. उपांत्य फेरीत सात्त्विक-चिराग जोडीसमोर चायनिज तैपेइच्या चेन चेंग कुआन व लिन बिंग वेई यांचे आव्हान असेल.

पाकिस्तानबाबत सरकारच्या भूमिकेचे पालन -अरुण धुमल

नवी दिल्ली : पहलगाम दहशतवादी हल्ला आणि त्यानंतरचे ऑपरेशन सिंदूर यामुळे वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानशी क्रिकेट खेळण्यास होत असलेला विरोध लक्षात घेत इंडियन प्रीमियर लीगचे (आयपीएल) अध्यक्ष अरुण धुमल यांनी भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) पाकिस्तानसह क्रीडा संबंध ठेवण्याच्या बाबतीत सरकारच्या भूमिकेचे पालन करत आहे, असे सांगितले.

या दोन देशांमधील वाढत्या तणावग्रस्त परिस्थितीत पाकिस्तानशी खेळू नये अशी मागणी जोर धरत आहे. मात्र, केंद्र सरकारने पाकिस्तानशी द्विपक्षीय सामने खेळण्यास निर्बंध घातले आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत पाकिस्तानशी खेळण्यास हरकत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. या सगळ्या चर्चेमुळे क्रिकेटकारण चांगलेच तापले असून, या सगळ्या पार्श्वभूमीवर रविवारी भारत आणि पाकिस्तान यांच्यात आशिया चषक स्पर्धेतील सामना होणार आहे. केवळ बहुपक्षीय स्पर्धेत पाकिस्तानविरुद्ध खेळू,'' असे धुमल म्हणाले.

पाटीदार, राठोडची शतके

बंगळूरु : कर्णधार रजत पाटीदार (११५ चेंडूंत १०१ धावा) आणि यश राठोड (१८८ चेंडूंत नाबाद १३७ धावा) यांच्या शतकांच्या जोरावर मध्य विभागाने दुलीप करंडक क्रिकेट स्पर्धेत दक्षिण विभागाविरुद्ध दुसऱ्या दिवसअखेर ५ बाद ३८४ धावसंख्येपर्यंत मजल मारली. दक्षिण विभागाचा पहिला डाव १४९ धावांवर आटोपला. त्यामुळे मध्य विभागाकडे २३५ धावांची आघाडी आहे. पाटीदारने १५वे तर, यशने सातवे प्रथम श्रेणी शतक झळकावले. दिवसाचा खेळ संपला तेव्हा सारांश जैन (४७) व यश मैदानावर होते.

पाटीदार आणि यशने चौथ्या गड्यासाठी १६७ धावांची भागीदारी रचली. या कामगिरीनंतर मध्य विभागाने सामन्यावर पकड निर्माण केली. मध्य विभागाने एक वेळ ९३ धावांत तीन फलंदाज गमावले होते. मात्र, संघ त्यामधून सावरला. मध्य विभागाने बिनबाद ५० धावांच्या पुढे दुसऱ्या दिवशी खेळण्यास सुरुवात केली. पहिल्या सत्रात संघाने १०२ धावा जोडल्या. यादरम्यान संघाने दानिश मालेवार (५३), अक्षय वाडकर (२२) आणि शुभम शर्मा (६) यांना गमावले. पाटीदारला गुरजपनीत सिंगने बाद केले. यश आणि जैनने सहाव्या गड्यासाठी ११८ धावांची भागीदारी रचत मध्य विभागाची आघाडी २००च्या पुढे नेली.

भारतीय महिला संघाला विजय गरजेचा

'अव्वल चार' फेरीत जपानचे आव्हान

हांगझो (चीन) : गेल्या सामन्यात चीनकडून मिळालेल्या पराभवानंतर भारतीय संघाला महिला आशिया चषक हॉकी स्पर्धेची अंतिम फेरी गाठायची झाल्यास आज, शनिवारी जपानविरुद्ध होणाऱ्या 'अव्वल चार' फेरीतील सामन्यात विजय मिळवणे गरजेचे आहे.

भारतीय संघाने साखळी फेरीत जपानविरुद्ध २-२ अशा बरोबरीची नोंद केली होती. अंतिम फेरीसाठी भारताला आपली कामगिरी उंचवावी लागेल. जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानी असणाऱ्या चीनने यापूर्वीच अंतिम फेरीतील आपले स्थान निश्चित केले आहे. अंतिम सामना रविवारी पार पडेल. चीनकडून मिळालेल्या पराभवापूर्वी भारतीय संघ स्पर्धेत अपराजित होता. चीनविरुद्ध भारताने काही संधी गमावल्या. यामध्ये तीन पेनल्टी कॉर्नरचाही समावेश आहे. याचा फटका संघाला बसला. भारताचे मुख्य प्रशिक्षक हरेंद्र सिंह यांच्या संघाच्या कामगिरीची चिंता आहे.

भारताची मुमताज खान ही चांगल्या लयीत आहे. तिने मैदानी गोल केले. मात्र, नवनीत कौरकडून अधिक सहकार्याची तिला अपेक्षा असेल. याशिवाय ऋतुजा दादासो पिसाळ, लालरेम्सियामी, उदिता, शर्मिला देवी आणि ब्यूटी डुंग डुंग यांना आपली कामगिरी सुधारावी लागेल. नेहा गोयल आणि वैष्णवी विठ्ठल फाळके यांच्यावर भारताच्या मध्यक्रमाची धुरा आहे. कर्णधार सलीमा टेटेकडून संघाला अपेक्षा आहेत. भारतीय महिला संघ जागतिक क्रमवारीत नवव्या स्थानावर आहे. चीननंतर भारत स्पर्धेतील दुसरा सर्वोच्च क्रमवारी असणारा संघ आहे. आशिया चषक जिंकणारा संघ पुढील वर्षी बेल्जियम व नेदरलँड्स येथे होणाऱ्या विश्वचषकासाठी पात्रता मिळवेल. चीन जेतेपदाचा प्रबळ दावेदार असला, तरीही भारताला चांगली कामगिरी करण्याची संधी आहे.

- **वेळ :** दु. २.१५ वा.
- **थेट प्रक्षेपण :** सोनी स्पोर्ट्स टेन २.

भारतीय महिलांकडून चौथे पदक निश्चित

लिव्हरपूल : मीनाक्षी हुडाने जागतिक बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश करीत भारतासाठी चौथे पदक निश्चित केले. मात्र, जादूमणी सिंह मंदेंगबाम उपांत्यपूर्व फेरीत पराभूत झाल्याने पुरुष बॉक्सिंगपटू १२ वर्षांनी पदकाविना परतणार आहेत.

ऑलिम्पिकचा भाग नसलेल्या ४८ किलो वजनी गटात मीनाक्षीने उपांत्यपूर्व सामन्यात इंग्लंडची १९ वर्षांखालील जागतिक विजेती एलिस पंफ्रीला पराभूत केले. मीनाक्षीने आपल्या उंचीचा फायदा घेत प्रतिस्पर्धी खेळाडूवर ठोसे लगावले. उपांत्य फेरीत तिच्यासमोर २०२३ रौप्यपदक विजेता मंगोलियाच्या लुत्सैखानी अल्तांत्सेत्सेगचे आव्हान असेल. जॅस्मिन लम्बोरिया (५७ किलो), पूजा रानी (८० किलो) आणि नूपुर (८० किलोहून अधिक) यांनीही उपांत्य फेरी गाठत भारताचे पदक निश्चित केले.

जादूमणी सिंहने पुरुषांच्या ५० किलो वजनी गटाच्या उपांत्यपूर्व फेरीत सध्याचा जागतिक विजेता कझाकस्तानच्या संझार ताशकेनबेसमोर आव्हान उपस्थित केले. मात्र, त्याला पराभवाचा सामना करावा लागला.

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

परिशिष्ट-IV-ए - ई-लिलाव - स्थावर मालमत्तेची जाहीर विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ८(६) च्या तरतुदीसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्ता विक्रीकरिता ई-लिलाव-विक्री सूचना

नोंदणीकृत कार्यालय: ९वा मजला, अंत्रिक्ष भवन, २२ कस्तूरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली -११०००१. फोन्स: ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाइट : www.pnbhousing.com

शाखा कार्यालय नाशिक: ४०७ व ४०८, ४था मजला, पद्मा विश्व लॅण्डमार्क, तनिश्क शोरुमजवळ, ॲक्सिस बँकेच्या वरती, राक्का कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक- ४२२००२, महाराष्ट्र.

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून रकाना नं. "ए" मध्ये दर्शविलेल्या ऋणको व हमीदारांना सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण असलेल्या/ ताब्यात असलेल्या मालमत्तेचे विधाधक/ प्रत्यक्ष ताबा (रकाना नं. "सी"मध्ये वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा विधाधक/ प्रत्यक्ष ताबा (रकाना नं. "सी"मध्ये वर्णिलेल्यानुसार) **मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/** सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली दिलेल्या तपशीलानुसार **"जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे" आणि "जे काही आहे तेथे आहे"** या तत्त्वावर करण्यात येणार आहे. ऋणको/ गहाणकार/ विधि वारसदार, विधि प्रतिनिधी (जे ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत), तारखेनुसार सुधारित केल्याप्रमाणे सिक्युरिटी इंटरेस्ट रुल्स, २००२ च्या रुल ८(६) च्या ९ अंतर्गत रकाना नं. "ए" मध्ये दर्शविल्यानुसार, जसे असेल त्यानुसार, संबंधित ऋणको/ गहाणकारांचे (दिवंगत असल्यामुळे) निष्पादक, प्रशासक, उत्तराधिकारी, अधिहस्तांकिती यांना याद्वारा सूचना देण्यात आली आहे. विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया **मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/ सुरक्षित धनकोच्या www.pnbhousing.com** या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी.

लोन नं./ ऋणको/ सह-ऋणको/ हमीदार/ विधि वारसदारांचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व तारीख (बी)	ताब्याचा प्रकार (सी)	गहाण असलेल्या मालमत्तेचे वर्णन (डी)	राखीव किंमत (आरपी) (ई)	इरठे (आरपीची १०%) (एफ)	बोलीच्या सादरीकरणाची शेवटची तारीख (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहणीची तारीख व वेळ (आय)	लिलावाची तारीख व वेळ (जे)	ज्ञात भार/ न्यायालयीन प्रकरण, जर असल्यास (के)
HOU/NSK/1119/759523/ भिका कारभारी आहेर/ सिंधु भिका आहेर/ महेंद्रसिंह रुपसिंह पाटील/ शाखा कार्यालय: नाशिक	रु. १८,०४,११९.७२ व १५.०९.२०२१	प्रत्यक्ष ताबा	बिल्डिंग "ई" (उपासना), दुसरा मजला, २११.०, हरि संस्कृती, सर्व्हे नं. २४८/१ ते ६/ १+२+३+४ (पार्ट), निसर्ग लॉन्ससमोर, रेल्वे स्टेशनजवळ, खर्जुल मला, मौजे देवळाली, नाशिक- ४१३५८२, महाराष्ट्र, भारत.	रु. १६२३०००/-	रु. १६२३००/-	१६.१०.२५	रु. १०,०००/-	२७.०९.२०२५ रोजी दु. १२.०० व दु. ०४.०० दरम्यान	१७.१०.२०२५ रोजी दु. ०२.०० व दु. ०३.०० दरम्यान	ज्ञात नाही

* त्याकरिता वसुली आणि/ किंवा प्रदानाच्या तारखेपर्यंत निधालेले लागू असल्याप्रमाणे १८% प्र.व. दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, किंमत, आकार इ. सह एकत्रित. ** "पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"च्या प्राधिकृत अधिकारींना उपरोक्त नमूद केलेल्या मालमत्तेपैकी कोणत्याही एक किंवा अधिक मालमत्तांच्या संबंधात वरील सर्व किंवा कोणतेही अधिकार वापरण्याचा अधिकार असेल. (१.) आजच्या तारखेनुसार, तेथे वरील स्थावर मालमत्ता/ सुरक्षित मत्तेची विक्री करणे, अभिहस्तांतरण आणि/ किंवा वासलात लावणे यापासून "पीएनबीएचएफएल"ला/ "पीएनबीएचएफएल"च्या प्राधिकृत अधिकारींना प्रतिबंध करण्यास कोणताही आदेश आणि/ किंवा निषेधाज्ञा आलेली नाही आणि/ किंवा वरील स्थावर मालमत्ता/ सुरक्षित मत्तेची वासलात आणि दर्जा रकाना क्र. "के" मध्ये नमूद करण्यात आला आहे. (२.) भावी खरीदार/बोलीदार आणि स्वारस्य असलेले पक्षकार रकाना नं. "के" मध्ये नमूद केलेली व मंजूर केलेली प्रक्रिया/ आदेश इ., जर असल्यास, त्यामधील याचिकांबाबत तपासणी स्वत: स्वतंत्रपणे करू शकतील. समाविष्ट परंतु त्याकरिता "पीएनबीएचएफएल"कडे उपलब्ध असलेल्या संबंधित नामाधिकाराच्या कागदपत्रांचे नामाधिकार मर्यादित नाहीत आणि निविदा/ बोली अर्ज प्रपत्र किंवा प्रस्ताव सादर करण्यापूर्वी सर्व बाबतीत स्वत:च समाधान करून घ्यावे. बोलीदारने बोली प्रपात्रसमवेत या लिलावाच्या शर्ती व अटी स्वाक्षरीकृत करून घ्यावयाच्या आहेत. (३.) कृपया नोंद घ्यावी की, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ९(३)च्या अनुसार, बोलीदार/ खरीददाराने त्याच दिवशी किंवा उशिरात उशिरा कामाच्या पुढील दिवशी विक्री किंमतीच्या (इसारा रक्कम समाविष्ट, जर भरलेली असल्यास) २५% ठेव, कायदेशीरीत्या बांधील असलेली, भरावयाची आहे. विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ९(२) च्या अनुसार सुरक्षित धनकोद्वारा विक्री किंमतीच्या २५% रकमेच्या स्वीकृतीनंतरच केवळ बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री विचाराधीन उर्वरित रकमेच्या ७५% विक्री निश्चितीकरण पत्राच्या अभिस्वीकृतीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत खरीददाराद्वारा भरावयाची आहे आणि सदर ठेव भरण्यात कसूर झाल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्री निश्चितीकरण पत्रात नमूद केलेल्या १५ दिवसांचा अनिवार्य कालावधी संपण्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत विक्री निश्चितीकरण रकमेचा भागशः प्रदान जप्त करतील आणि मालमत्ता/ सुरक्षित मत्ता सरफेसी ॲक्ट्स्या तरतुदींच्या अनुसार पुन्हा विक्रीकरिता ठेवण्यात येईल. (४.) **सीए इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ई-लिलावाद्वारा विक्रीच्या आयोजनात प्राधिकृत अधिकारीस सहाय्य करणार आहे. तिचे कॉर्पोरेट कार्यालय येथे असलेले- प्लॉट नं. ६८, सिस्सा भजला, सेक्टर ४४, गुरगाव, हरयाणा-१२२००३ वेबसाइट- www.bankeauctions.com बोली कागदपत्रे प्राप्त करणे किंवा मालमत्तेच्या पाहणीसंबंधित कोणत्याही सहाय्याकरिता आणि कोणत्याही अन्य शंका किंवा नोंदणीकरिता तुम्हास गणेश अंकुश/ निलाक्षी पाटील टोल-फ्री नं.: १८०० १२० ८८००, जी "पीएनबीएचएफएल"ची अधिकृत व्यक्ती आहे, यांच्याशी समन्वय साधावयाचा आहे किंवा www.pnbhousing.com या वेबसाइटला भेट द्यावी.**

स्थळ: नाशिक, दिनांक: १३.०९.२०२५ स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

HDFC BANK We understand your world

रजि. ऑफिस : एच.डी.एफ.सी. बँक लि., एच.डी.एफ.सी. बँक हाऊस, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल (प.), मुंबई-४०० ०१३.

पत्ता: रिटेल पोर्ट फोलिओ मॅनेजमेंट, एचडीएफसी बँक लि., दिवेकर प्लाझा, दुसरा मजला, अहिल्या होळकर चौक, स्टेशन रोड, पद्मपुरा, छ. संभाजीनगर (औरंगाबाद) - ४३१००१.

मागणी नोटीस

सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲंड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट रूल्स २००२ मधील नियम १३(२) प्रमाणे.

एच.डी.एफ.सी. बँकेकडून खाली उल्लेखित सुरक्षित कर्ज खालील कर्जदार व सहकर्जदार यांनी घेतलेले आहे. खाली उल्लेखित कर्जदार व सहकर्जदार यानी त्यांच्या मालमत्ता तारण ठेवून हे कर्ज घेतलेले आहे. हे कर्जदार व सहकर्जदार कर्ज करारातील अटी व शर्तींचे पालन करण्यास असमर्थ ठरले आहेत व अनियमित ठरले आहेत, त्यांचे कर्ज आर. बी. आय. निर्देशास अनुसरून एन.पी.ए. सदराखाली गेले आहे. खालील तक्त्यामध्ये लिहिल्याप्रमाणे व तेथे उल्लेखित नोटीसीप्रमाणे त्यांनी **एच. डी. एफ. सी. बँकेस** देय रक्कम आहे व त्यावरील व्याज लागू राहील आणि ते करारातील उल्लेखित दराप्रमाणे संबंधीत तारखेपासून लागू राहील.

अ. नं.	कर्ज खाते नंबर व कर्जाचा प्रकार	कर्जदार आणि सहकर्जदारांची नांवे	तारण मालमत्तेचा तपशील	१३(२) नोटीसी-नुसार येणेबाकी	नोटीस तारीख
१)	५०२०००३१० ७२५३६ लोन अगेन्स्ट प्रॉपर्टी	१) ए. आर. इलेक्ट्रॉनिक्स इएस अँड गिफ्ट कलेक्शन, श्री. मोहम्मद अझर अब्दुल जब्बार काझी २) अब्दुल जब्बार मोहम्मद अकबर हुसैन काझी	पैठण गेट, औरंगाबाद, महाराष्ट्र - ४३१००१ येथील सी.टी.एस. क्र. १३९१९ वर बांधण्यात आलेल्या सनी कॉर्नर अपार्टमेंटच्या तळ मजल्यावरील शॉप क्र. २ ही तेथील सर्व हक्क, अधिकार व सुधारणांसह असलेली मालमत्ता.	दि.३०.०७.२०२५ पर्यंतची रक्कम रु. १७,०१,६४०.०९	०५ ऑगस्ट २०२५

ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून ६० दिवसाचे आत वरील तक्त्यामध्ये उल्लेखित रक्कम व त्यावरील वर दर्शविलेल्या तारखेपासूनचे करारानुसार व्याज व इतर सर्व खर्चासहीत रक्कम **एचडीएफसी बँक** यांचेकडे जमा करावेत अन्यथा सरफेसी कायद्यामधील कलम १३(४)/१४ प्रमाणे **एच. डी. एफ. सी. बँकेस** देय रक्कम वसूल करण्यासाठी सदर गहाण मालमत्तेवर कार्यवाही केली जाईल. सदर कायद्यातील कलम १३(१३) च्या खाली यापुढे सदर मालमत्ता विकणे / गहाण देणे व इतर काहीही करण्यास मनाई करण्यात येत आहे.

दिनांक: ११/०९/२०२५ सही/-

ठिकाण : छ. संभाजीनगर (औरंगाबाद). (इंग्रजी नोटीसीचे हे भाषांतर असून अर्थबोध होण्यासाठी इंग्रजी मसुदाच ग्राह्य धरण्यात येईल.) **अधिकृत अधिकारी, एचडीएफसी बँक लि.** IPPL-25

केनरा बैंक Canara Bank भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking सिंडिकेट Syndicate

आस्ती वसुली व्यवस्थापन (एआरएम) शाखा

प्लॉट नं. 32, पहिला मजला, कॉर्पोरेशन कॉलनी, नॉर्थ अंबाझरी रोड, लाड मेट्रो स्टेशन जवळ, गांधी नगर, नागपूर - 440010 (महाराष्ट्र)

ई-मेल : cb6820@canarabank.com | फोन नं. - +91 9271071694

ई-लिलाव-अचल संपत्ती ची विक्री सूचना

अचल संपत्तीची ई-लिलाव विक्री सुचना सेक्युरिटायझेशन ॲण्ड रिकंन्सट्रक्शन ऑफ फायनांसियल ॲसेटस ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 रुल 8 (6) सोबत वाचल्या जाणा-या सिक्युरिटी (इन्फोर्समेंट) रुल्स, 2002

या द्वारे जनतेला सार्वजनिक पणे आणि विशेष करुन कर्जदार आणि जमानतदार यांना सुचित केल्या जात आहे की, खालील अचल संपत्ती बँकेकडे गहाण/प्रभाराधीन आहे. ज्याचा ताबा कॅनरा बैंक, अधिकृत अधिकारी यांनी घेतला आहे आणि "जेथे आहे तसे" "जे आहे तसे" आणि "जे काही आहे" या तत्वावर खालील नमुद कर्जदारांकडुन कॅनरा बँक, थकबाकी असलेली रक्कम वसुल करण्याकरीता भारांसह **दिनांक 30/09/2025 ला दुपारी 12.00 ते दुपारी. 01.00 वाजे पर्यंत** विक्री केली जाईल. (बँकेच्या माहिती प्रमाणे कोणत्याही भार नाही).

ई-लिलाव तारीख 30/09/2025, दुपारी 12.00 ते दुपारी. 01.00 वाजेपर्यंत; ईएमडी तारीख 29/09/2025

अ. क्र.	कर्जदार / जमानतदाराचे नाव व पत्ता	स्थावर मालमत्तेचे विवरण	सांकेतिक / प्रत्यक्ष ताब्याचे प्रकार	राखीव किंमत (रु.) बयाना रक्कम (रु.)	थकीत देय रक्कम (रु.)	बोली जमा करण्याची तारीख
1	**मेसर्स सोना फ्लोअर अँड फूड्स प्रायव्हेट लिमिटेड त्यांच्या द्वारा संचालक : 1. श्री रामराव जी. खाडे, 2.श्रीमती. द्वारका खाडे, 3. श्री रुपेश आर. खाडे** पत्ता: प्लॉट नं. 100, भाऊसाहेब सुर्वे नगर जयताळा रोड, नागपूर, महाराष्ट्र - 440022.	फ्लॅट नं. 3, पहिला मजला, क्षेत्रफळ 136.62 चौ.मी. प्राईड मोनार्क अपार्टमेंट, सर्व्हे नं. 18/ 5ई/1, सीटिएस नं. 4241, देवठाली शिवार, तहसिल आणि जिल्हा नाशिक. **चतुसिमा खालीलप्रमाणे : पूर्व :** फ्लॅट नं. 3 आणि 4, **पश्चिम :** फ्लॅट नं. ए-4, **उत्तर :** सिमांत जागा, **दक्षिण :** सर्व्हे नं. 316 असलेली जमीन **संपत्तीचे मालक : श्री. रामराव जी. खाडे.**	सांकेतिक	रु. 60,00,000/- रु. 6,00,000/-	रु. 4,79,47,343.48 02/09/2025 रोजी + लागु व्याज इतर शुल्क	29/09/2025 रोजी संध्याकाळी 5.00 पर्यंत किंवा त्यापूर्वी

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी कृपया सेवा प्रदाता बँकनेट (मेसर्स पीएसबी अलायन्स प्रा. लि.), (संपर्क क्रमांक 7046612345/ 6354910172/8291220220/9892219848/8160205051, ईमेल: support.BAANKNET@psballiance.com/ support.ebkray@procure247.com) यांच्याशी संपर्क साधा." किंवा कोणत्याही कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत कॅनरा बँकेच्या एआरएम शाखा नागपूरच्या मुख्य व्यवस्थापकाशी सं